पिन–४००६१२ दुरध्वनी क्रमांक ०२२,२५४६८३१५
e-mail.cp.thane.mumbra@mahapolice.gov.in



जा.क/ 1705/ मुंब्रा पोलीस स्टेशन,ठाणे /२०२६. दिनांक : ०३/०९/२०२६

# प्रेसनोट

मुंब्रा पोलीस स्टेशन, ठाणे शहर, गुन्हा नोंद क्र. १४८४/२०२६ भा.न्या.संहिता २०२३ चे कलम २८१ ,१२५ (अ) १२५ (ब), १०६,३२४ (४) सह मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४ (अ) १३४ (ब), मधील फिर्यादी साजीद मो. सलीम शाईन हे त्यांची पत्नी सानिया बानु व दोन मुलांसह मो.सा. क्र. MH-04-LN-6487 वरून मुंब्रा कडुन भिवंडी कडे दि. २९/०८/२०२६ रोजी दुपारी ०१:४० वाजताचे सुमारास रेल्वे ओव्हर लोखंडी ब्रिज निरंकारी बाबा हॉलचे जवळ रेतीबंदर रोडने जात असताना अचानक पाठीमागुन मुंब्रा बाजुकडुन येणा–या अनोळखी अवजड वाहनाने फिर्यादी यांच्या मोटारसायकलला पाठीमागुन उजव्या बाजुस जोरात धडक दिल्याने फिर्यादी, त्याची पत्नी सानिया मुले रस्त्यावर खाली पडले त्यावेळी धडक देणारे वाहन चालक सर्वांना बाजुकडे निघुन गेला सदर मोटार अपघातामध्ये फिर्यादीच्या उजव्या हातास व पायाला दुखापत झाली तसेच त्याची पत्नी हिचे डोक्याला कमरेस हाताला व लहान मुलगा साजिद याचे डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांना दवाउपचारकरीता छत्रपती शिवाजी हॉस्पीटल येथे घेवुन गेले असता डयुटीवरील डॉक्टरांनी फिर्यादीची पत्नी सानिया व मुलगा शाहबाज यास तपासुन मयत घोषीत केले. म्हणुन अज्ञात वाहन चालक विरूध्द वरील प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

तरी सदर गुन्हयातील अज्ञात वाहनचालक आरोपीत यास शोध घेणे करीता सदरची घटना कोणी वाहन चालक अथवा इतर लोकांनी पाहिली असता सदरची माहीती देणेकरीता त्वरीत मुंब्रा पोलीस ठाणे येथे खालील क्रमांकवर संपर्क साधावा.

१) मुंब्रा पोलीस ठाणे दुरध्वनी क्रमांक ०२२,२५४६८३१५